# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## ( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### परिपत्रक क्र. ०८/२०२६

पुणे ग्रँड चॅलेंज टूर, २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धा दिनांक १९ जानेवारी, २०२६ ते २३ जानेवारी, २०२६ या कालावधीत पुणे जिल्हयात होणार असून दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. पुणे शहरात दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी प्रोलॉग रेस होणार आहे.

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांच्या संदर्भ जावक क्र.आव्यप्रा/१७/२०२६, दिनांक १७.०१.२०२६ रोजीच्या आदेशा नुसार पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या अनुषंगाने पुणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी नगर घोले रोड, विश्रामबाग वाडा कसबा, ढोले पाटील रोड, भवानी पेठ, औंध बाणेर, कोथरुड बावधन, सिंहगड रोड, वारजे कर्वेनगर या क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील सर्व आंगणवाडी, शासकीय व खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळा, आश्रमशाळा, मनपा व नगरपालिकेच्या शाळा, महाविद्यालये, आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र, व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी होणाऱ्या प्रोलॉग रेस च्या दिवशी सुट्टी जाहिर करण्यात आलेली आहे.

सदर पार्श्वभूमीवर पुणे जिल्हयात होत असलेल्या पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेअंतर्गत होणाऱ्या प्रोलॉग रेस करिता विद्यापीठ कार्यालयास दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी सुट्टी जाहीर करणे आवश्यक आहे.

**याबाबत प्राप्त आदेशानुसार, या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सोमवार, दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी विद्यापीठ कार्यालयास सुट्टी जाहीर करण्यात येत आहे.**

तथापि, विद्यापीठ आस्थापनेतील स्थावर विभाग, सुरक्षा विभाग व आरोग्य केंद्र हे विभाग अत्यावश्यक सेवा अतंर्गत येत असल्याने सदर विभागांचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरु राहील. सदर विभागातील संबंधितांना सदर दिवसाची पर्यायी रजा नंतर देय राहील. त्याचप्रमाणे कोणत्याही अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाकरिता वरिष्ठांनी संबंधितास कार्यालयात बोलविल्यास त्यांना कार्यालयामध्ये त्वरीत उपस्थित राहणे अनिवार्य राहील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**उपकुलसचिव**
प्रशासन शिक्षकेतर कक्ष

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/१८२
दिनांक : १८/०१/२०२६

**सोबत :-** वरीलप्रमाणे.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

आपणास विनंती की, सदर परिपत्रकातील आशय संबंधितांच्या निदर्शनास आणावे.